**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु

**<u>प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस</u>**

१४. माझ्या वडीलांचे संपूर्ण नाव शिवाजी रामचंद्र गार्डे असे आहे. आम्ही दोघे भाउ आहोत. माझ्या भावाचे नाव दिलीप शिवाजी गार्डे असे आहे. हे म्हणणे खरे आहे की आम्ही दोघाही भावंडांनी पदवीचे शिक्षण घेतलेले नाही. आम्हाला चार चुलते होते. मला मारुती रामचंद्र गार्डे यांची जन्मतारीख माहिती नाही. ते दि.२४.११.२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांना एक मुलगी आहे. ती प्रतिवादी क्र.१ आहे. तीचे शिक्षण एमएबीएड झाले आहे. तीच्या शिक्षणाचा खर्च तीच्याच वडीलांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे हे मुंबईला राहायचे व टेलरींगचे काम करायचे. त्यांचया पत्नीचे नाव काशीबाई असे होते. मला मारुतींचे शिक्षण किती झाले होते हे सांगता येणार नाही. माझे वडील दि.०५.०६.२०१४ रोजी मृत्यू पावले होते. त्यांचा अपघाती मृत्यू झाला होता. मारुती गार्डे किती काळाकरीता मुंबईला होते तो निश्चीत कालावधी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे त्यांची पत्नी व मुलगी मुंबईला राहत असताना माझे वडील गावीच राहायचे. ते सर्वजण सन १९८७ साली गावी कायमस्वरुपी राहायला आले. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ चे काही शिक्षण मुंबईला व काही शिक्षण गावी झाले. माझा जन्म दि.१७.१०.१९७८ रोजीचा आहे. मारुती गार्डे ज्यावेळी मुंबईवरुन गावी आले त्यावेळी त्यांच्याकडे किती पैसे होते या बाबत मला निश्चीत असे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की गावी आल्यानंतर सुध्दा मारुती गार्डे त्यांच्या कुटूंबीयांसह म्हणजेच त्यांची पत्नी व मुलीसह एकत्रच राहायचे. प्रतिवादी क्र.१ चे लग्न तिच्या शिक्षण पुर्ण झाल्यानंतर झाले.

***न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने उर्वरीत उलटतपास तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

*स्वाक्षरी/-*
(आर. एम. भेंडे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, वाई.

दिनांक :- ०७/०८/२०२४